## Colaba-Bandra-SEEPZ Metro-3 Corridor

# ब्युरो व्हेरिटास इटालिया करणार मेट्रो लाईन 3 च्या सिग्नलिंग व ट्रेन कंट्रोल, प्लॅटफॉर्म स्क्रीन दरवाजे आणि रोलिंग स्टॉक सबसिस्टमच्या सुरक्षचे मूल्यांकन

मुंबई, १७ सप्टेंबर २०१९: मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे (मुं.मे.रे.कॉ) मेट्रो-३ च्या सिग्नलिंग व ट्रेन कंट्रोल, प्लॅटफॉर्म स्क्रीन दरवाजे आणि रोलिंग स्टॉक सबसिस्टमच्या स्वतंत्र सुरक्षा मूल्यांकन (आयएसए) सेवांसाठीचे कंत्राट देण्यात आले. संबंधित निविदांमधून अत्यंत काटेकोर पद्धतीने निवडण्यात आलेल्या मे. ब्युरो व्हेरिटास इटालिया एस.पी.ए सोबत हा करार करण्यात आला.

एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालक श्रीमती अश्विनी भिडे यावर प्रतिक्रिया देताना म्हणाल्या की, मेट्रो मार्गाच्या सुरक्षित आणि यशस्वी चलनवलनासाठी स्वतंत्र सुरक्षा मूल्यांकन (आयएसए) अनिवार्य आहे. मुंबई मेट्रो प्रकल्पासाठी सिग्नलिंग व ट्रेन कंट्रोल, प्लॅटफॉर्म स्क्रीन दरवाजे आणि रोलिंग स्टॉक सबसिस्टमचे स्वतंत्र सुरक्षा मूल्यमापन सुनिश्चित वेळेत करण्याचे आमचे लक्ष्य आहे.

**Rajesh Konduparti**
**+91 8469834515**
Rajesh.konduparti@perceptindia.in